# विभागीय उप आयुक्त महिला व बाल विकास विभाग
# नाशिक विभाग नाशिक,यांचे कार्यालय,

पत्रव्यवहाराचा पत्ता -
नासार्डी पुला जवळ,नाशिक क्लब समोर
नाशिक पुणे रोड, नाशिक

☎ फोन क्रमांक . 0253 / 2237422
फॅक्स क्रमांक.
E-mail- division . nashik @ rediffmail.com

जा.क्र.विउमबावि/नाविना /ई - निविदा जाहिरात/ **796** /2013-14/ नाशिक दिनांक- 21 / 08 /2013

प्रति
उपसंचालक (माहिती)
विभागीय माहिती कार्यालय,
नाशिक.

विषयः- ई - निविदा **द्वितीय मुदतवाढ** जाहिरात प्रसिध्दी करणे बाबत

उपरोक्त विषयान्वये विनंती करण्यात येते की, विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास विभाग, नाशिक विभाग, नाशिक या कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या जळगांव जिल्हायातील 2 शासकीय संस्थांना अन्नधान्य व इतर खाद्योपयोगी वस्तू तसेच नित्योपयोगी किरकोळ वस्तुचा पुरवठा करणे बाबत विभागातील सर्वात जास्त प्रसिध्द होणा-या वर्तमान पत्रातून ई - निविदा द्वितीय मुदतवाढ जाहिरात देणे बाबत विनंती करण्यात येत आहे.

**जाहिराती बाबतचा आवश्यक तपशिल खालीलप्रमाणे देत आहे.**

1) जाहिरात देणा-या अधिका-याचे नांव :- श्री एच.बी.राठोड
2) पदनाम व पत्रव्यवहाराचा पत्ता :- विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास विभाग, नाशिक विभाग नाशिक, नासार्डी पुला जवळ,नाशिक क्लब समोर नाशिक पुणे रोड, नाशिक
3) जाहिरात कोणत्या तारखेस प्रसिध्द :- दि. 23 /08 /2013 करावयाची आहे
4) प्रसिध्दीचे स्वरुप :- विभागीयस्तर
5) प्रसिध्दी किती वेळा व किती वर्तमान :- सर्वाधिक खपाचे एक वेळा एका वर्तमान पत्रात
6) जाहिरात देयक कोणाच्या नावे करावयाचे :- विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास विभाग , नाशिक,विभाग नाशिक

सोबत द्वितीय मुदतवाढ जाहिरात नमुना जोडला आहे कृपया सदरची जाहिरात दि. 23/08/2013 रोजी प्रसिध्द करण्यात यावी हि विनंती.

आपला विश्वासु,

( एच.बी.राठोड )
विभागीय उप आयुक्त
महिला व बाल विकास विभाग
नाशिक विभाग नाशिक

## ई निविदा प्रथम मुदतवाढ जाहिरात

विभागीय उप आयुक्त ,महिला व बाल विकास विभाग,नाशिक विभाग, नाशिक या कार्यालयाचे कक्षेत येणा-या नाशिक विभागातील जिल्हानिहाय शासकीय संस्था.

**अ ) जळगांव जिल्हा**

1) अधिक्षक, आशादिप महिला वसतीगृह, 6 विजय कॉलनी, अशोक बेकरीजवळ, जळगांव.

2) अधिक्षक, शासकीय मुलांचे (क/व) बालगृह, वाक, ता.भडगांव, जि.जळगांव

वरिल जिल्हयामधील शासकीय संस्थांना अन्नधान्य व इतर खाद्योपयोगी वस्तू तसेच नित्योपयोगी किरकोळ वस्तुचा पुरवठा करण्यासाठी सन 2013.14 या वित्तीय वर्षातील कालावधीसाठी दोन लिफाफा पध्दतीने ई-निविदा मागविण्यात येत आहे. ई- निविदा संचात नियम व अटी देण्यात आलेल्या आहेत.

सदरच्या ई - निविदा स्थानिक सहकारी भांडार ,मान्यता प्राप्त धारक, इतर स्थानिक खाजगी विक्रेते यांना भरता येईल मात्र त्यांना विविध मालाची खरेदी ,विक्री करण्याचा परवाना असणे आवश्यक आहे .त्यांनी दुकानाचे नांव ,दुकानाचा पत्ता,नोंदणी क्रमांक, दिनांक व शॉप ॲक्ट सेल्स पब्लिकेशमेंट खाली आयकर प्रमाणपत्र, सेलटॅक्स रजिस्ट्रेशन क्रमांक हे कागदपत्र ई - निविदा सोबत जोडणे आवश्यक आहेत.

सदर ई - निविदा बाबत विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास विभाग, नाशिक विभाग, नाशिक यांचा निर्णय अंतिम राहील.

## ई - निविदा बाबतचा आवश्यक तपशिल खालील प्रमाणे

1) ई -निविदा भरतांना ती निविदा वरिल दोन जिल्हयातील शासकीय संस्थेसाठी जिल्हानिहाय भरणे आवश्यक आहे.
1) ई -निविदा भरतांना अन्नधान्य व इतर खाद्योपयोगी वस्तू तसेच नित्योपयोगी किरकोळ वस्तुसाठी एकच निविदा भरणे आवश्यक आहे.
2) ई -निविदा फॉर्म किंमत प्रत्येकी ना-परतावा प्रमाणे रु. 2,000/- असेल.
3) ई निविदा भरतेवेळी ऑनलाईन ऐनरोलमेंट करणे गरजेचे आहे तसेच डिजिटल सिग्नेचर (ई टोकन) अनिवार्य आहे . सदर माहिती संदर्भात 0253-2237422 या ठिकाणी संपर्क साधल्यास पुर्ण माहिती मिळेल.
4) ई -निविदा विक्रीचे व स्विकारण्याचे ठिकाण:- https://wcd.maharashtra.etenders.in
5) ई-निविदा उघडण्याचे ठिकाण:- विभागीय उपआयुक्त, महिला व बाल विकास, नाशिक विभाग, नाशिक यांचे कार्यालयात दि. 07/09/2013 वेळ 17.01 रोजी किंवा सोईस्कर कामाच्या दिवशी.

## ई निविदा द्वितीय मुदतवाढ वेळापत्रक

| अ.क्र. | कार्यालयीन स्टेज | एजन्सी पुरवठादार स्टेज | पासून दिनांक व वेळ | पर्यंत दिनांक व वेळ |
|---|---|---|---|---|
| 1 | निविदा प्रकाशीत करणे | -- | 03.07.2013 (10.00) | 04.07.2013 (12.00) |
| 2 | -- | निविदा खरेदी व डाऊनलोड | 04.07.2013 (12.01) | 30.08.2013 (17.00) |
| 3 | -- | निविदा तयार करणे | 04.07.2013 (12.01) | 03.09.2013 (17.00) |
| 4 | तांत्रिक लिफाफा बंद करणे | -- | 03.09.2013 (17.01) | 03.09.2013 (18.00) |
| 5 | व्यापारी लिफाफा बंद करणे | | 03.09.2013 (17.01) | 03.09.2013 (18.00) |
| 6 | -- | निविदा सादर करणे | 03.09.2013 (18.01) | 07.09.2013 (17.00) |
| 7 | तांत्रिक लिफाफा उघडणे | -- | 07.09.2013 (17.01) | 12.09.2013 (17.00) |
| 8 | व्यापारी लिफाफा उघडणे | -- | 07.09.2013 (17.01) | 12.09.2013 (17.00) |

### नाशिक विभागातील खालील जिल्हयातील शासकीय संस्थांना अन्नधान्य व इतर खाद्योपयोगी वस्तू तसेच नित्योपयोगी किरकोळ वस्तुच्या खरेदीची अंदाजे रक्कम व बयाणा रकमेचा तपशिल दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | जिल्हा | ई - निविदेची एकुण अंदाजित रक्कम | बयाणा रक्कम | बिलातुन कपात होणारी सुरक्षा अनामत रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | जळगाव | 20,00,000 /- | 60,000/- | प्रत्यक्ष पुरवठयाच्या किमती नुसार |

विभागीय उप आयुक्त
महिला व बाल विकास विभाग
नाशिक विभाग नाशिक

# नि वि दा प त्र- अ

महिला व बाल विकास खात्याच्या कक्षेत येणा-या नाशिक विभागातील वरिल शासकीय संस्थांना प्रत्यक्ष वस्तुंचा पुरवठा करण्याबाबत आदेश दिलेच्या तारखेपासुन सन 2013-2014 या आर्थिक वर्षाच्या कालावधीसाठी प्रपत्र सोबत जोडलेल्या यादीनुसार अन्नधान्य व इतर खाद्योपयोगी वस्तू तसेच नित्योपयोगी किरकोळ वस्तुंचा पुरवठा करण्यासंबंधी ई - निविदा द्वितीय मुदतवाढ.

ई - निविदा फॉर्म किंमत रु. 2,000/- (अक्षरी रु. दोन हजार मात्र )

ई-निविदा उघडण्याची तारीख 07 /09/2013 दुपारी 17.01 वाजता किंवा सोईस्कर कामाच्या दिवशी.

मी खालील सही करणार --------------------

खाजगी ठेकेदाराचे नांव ----------------------

वय:-

पत्ता:- ---------------------------------------

संस्थेचे नांव :- -------------------------------

संस्था रजिस्टर क्रमांक व दिनांक :-

ज्या ॲक्ट खाली संस्था रजिस्टर झाली त्यांचे नांव :-

स्वखुशीने लिहून देतो कि, नाशिक विभागातील ---------------- या जिल्हयातील शासकीय संस्थेस जीवनोपयोगी व नित्योपयोगी खादय व इतर वस्तुंचा पुरवठा करण्याचा ठेका मला/आम्हाला दिलेल्या तारखेपासुन एक वर्षाच्या कालावधीस व पुढील ठेका मंजुर होईपर्यंत जोडलेल्या अटी व शर्ती व नियमानुसार तसेच संस्थेच्या यादीत दर्शविलेले माझ्या पत्रकाप्रमाणे देण्यास तयार आहे.

या ई - निविदा पत्रकासोबत जोडलेलेली जीवनोपयोगी व नित्योपयोगी खादय व इतर वस्तुंचा पुरठयासंबंधीची नियमावली ती ई - निविदा भरण्यापुर्वी मी काळजीपुर्वक वाचली असुन नंतर सही केली आहे. त्यात नमुद केलेल्या सर्व अटी-शर्ती व नियम; माझा ठेका, ठेक्याची वाढीव मुदत संपेपर्यंत मला संपुर्णपणे बंधनकारक राहील. याबाबत मी शासनाचे पुर्व परवानगीशिवाय कोणत्याही न्यायालयास अर्ज दाखल करणार नाही.

या ई - निविदा मान्य झाल्यास आवश्यक तो करारनामा रु.100/-चे टॅम्प पेपरवर स्वखर्चाने संस्थेचे समक्ष त्वरीत करुन देण्यास तयार आहे.

1. आयकर बाकी नसल्याचें आयकर खात्याचे प्रमाणपत्र
2. विक्री कर बाकी नसल्याचे विक्रीकर खात्याचे प्रमाणपत्र
3. बँक /तहसीलदार कडील हैसियत प्रमाणपत्र
4. सहकारी संस्थांनी अथवा संस्थांनी ई - निविदा भरणेबाबत त्यांचे पदाधिका-यांचा ठराव आणि ज्या व्यक्तीच्या नावाने निविदा भरावयाचे अधिकार दिलेले आहेत ते अधिकार निविदेसोबत जोडलेले आहेत.
5. सहकारी संस्थेचे महिला सहकारी संस्था व अन्य औदयोगिक संस्था यांचे कार्यक्षेत्र विचारात घेता ज्या तालुक्यात अथवा जिल्हा मर्यादित त्यांचे कार्यक्षेत्र कक्ष असेल तालुका अथवा जिल्हयाकरीताच विचार करण्यात येईल.
6. वरिल प्रमाणे ज्या सहकारी संस्थांना अनामत रक्कम भरणेपासुन सुट हवी असेल अशा सदर संस्थांना सुट मिळण्यास पात्र असल्याबाबतचे संबधित अधिका-याकडुन सहकारी खात्याचे प्राधिकृत प्रमाणपत्र व शासनाच्या आदेशाची प्रत जोडावी व ई - निविदा सादर करतांना सदर आदेशाच्या प्रतींची स्वतंत्र प्रत संबंधीत अधिका-याला दाखविल्यानंतरच निविदा स्विकारण्यात येतील . सदर कागदपत्रे विहित मुदतीत व्यक्ती/ठेकेदार/संस्था इ. यांनी सादर न केल्यास पुर्ततेअभावी त्यांचे ई - निविदा अस्विकृत करण्यात येईल. त्या बाबत कोणतीही तक्रार मान्य केली जाणार नाही. याची मला पुर्णपणे जाणीव आहे.

स्थळ:- नाशिक

ठिकाण:- / /2013

निविदाधारकाची सही व शिक्का

नांव व पत्ता

# नियम व अटी

## ई - निविदा पत्रासोबत जोडावी लागणारी कागदपत्रे

1. ज्या महिला सहकारी संस्थांना अगर खाजगी विक्रेत्यांनी ई - निविदापत्रके नेली असतील त्यांनाच ते भरता येईल. दुस-यास भरता येणार नाही. असे केल्यास ई - निविदा अनियमीत समजली जाईल.
2. वरिल प्रमाणे ज्या सहकारी संस्थानी अगर खाजगी विक्रेत्यांनी ई - निविदा भरलेल्या असतील त्यांनाच सर्व ई - निविदा पाहण्याचा अधिकार राहील.
3. सोसायटीने अगर खाजगी विक्रेत्यांनी एखादया व्यक्तीस सर्व व्यवहार पाहण्याचे अधिकार दिले असतील तर ते अधिकार पत्र ई - निविदे सोबत जोडणे आवश्यक आहे.
4. सहकारी संस्था ज्या कारणास्तव पंजीबध्द/रजिस्टर झालेली आहे त्या बाबतचे व्यवहार करण्याबाबतचा उपनिबंधक, सहकारी संस्था किंवा प्राधिकृत अधिकारी यांनी अधिकार दिल्याबाबतचा दाखला सहकारी संस्थेने ई - निविदेसोबत जोडणे आवश्यक आहे. या ई - निविदेतील वस्तु पुरवठया सबंधीचा व्यवहार/व्यवसाय प्रत्यक्ष करीत असल्याबाबत उद्देशात स्पष्ट नमुद असले पाहिजे तसेच नियमाप्रमाणे आवश्यक असल्यास सहा.निबंधक, उपनिबंधक यांचे संस्थेने ई - निविदा सादर करण्यासंबंधी मंजुर पत्र सोबत जोडणे अत्यावश्यक आहे.
5. वरिल प्रमाणे सहकारी संस्थांना ई - निविदा भरतेवेळी निविदा दर भरण्यास अधिकार देणारा पंच कमिटीचा ठरावासोबत सुचक व अनुमोदक यांचे नावासह दाखल केला पाहिजे
6. खाजगी घाऊक विक्रेत्यास वस्तुंची घाऊक विक्री करण्यास परवानगी असलेल्या संबंधीत प्रमाणपत्राची खरी नक्कल/सांक्षांकीत झेरॉक्स प्रत ई - निविदासोबत जोडावी लागेल.
7. खाजगी घाऊक विक्रेता जर रजिस्टर पार्टनरशिप असेल तर त्यांना त्या फर्ममधील प्रत्येक भागीदाराने सदर ई - निविदा पत्रकास अनुमोदन दिल्याबाबतचे अधिकृत सहया असलेले प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
8. ठेकेदारास ई - निविदा भरतेवेळेस जाहिर केल्याप्रमाणे ई - निविदा बयाणा रक्कम विभागीय उपआयुक्त, महिला व बाल विकास विभाग, नाशिक विभाग, नाशिक यांचे नावे राष्ट्रीयीकृत बँकेचा धनाकर्ष असणे बधनकारक आहे त्याची स्कॅन केलेली प्रत सोबत जोडावी लागेल.
9. बयाणा रक्कम अनामत रक्कम किंवा कोर्टाच्या अनुषंगाने देय असलेली रक्कम काही कारणास्तव विलंब झाल्यास त्यावर व्याज आकारता येणार नाही.
10. नोंदणीकृत महिला संस्था, महिला सहकारी संस्था अथवा इतर सहकारी संस्थांना बयाणा रक्कम व अनामत रक्कम भरण्याकरीता शासनाचे प्रचलीत नियमाप्रमाणे सुट देण्यात येईल, परंतु अशा संस्थांनी वरील रक्कमेतुन शासनाने सुट दिल्याचा शासन निर्णय सादर करणे संस्थेवर बंधनकारक आहे.1961चे आयकर कायदयाचे कलम 191 अ मधील तरतुदीनुसार शासनाने कंत्राटदारास कंत्राटाची रक्कम अदा करतांना देय रक्कमेच्या 2% नियमाप्रमाणे प्रचलित लागु असलेल्या दरानुसार आयकर वसुल करावयाचा आहे या तरतुदीचा विचार करुन बिलाची रककम अदा करतांना वरील नियमाप्रमाणे कारवाई केली जाईल .
11. महसुल विभागाच्या तहसिलदार अथवा त्यापेक्षा वरच्या दर्जाच्या अधिका-याकडून प्राप्त केलेले रु.10,00,000/- चे हैसियत प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. अथवा निविदा सोबत राष्ट्रीयीकृत बँकेकडुन प्राप्त केलेले स्वत:च्या नावाचे रु.10,00,000/- चे हैसियत प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. अथवा ज्यांची हैसियत रु.10,00,000/- ची आहे असे जमानतदार दिले पाहिजे. त्यांची जमानत रु.100/- च्या जनरल स्टॅम्प पेपरवर लिहुंन सोबत त्या इसमाचे हैसियत प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. सहकारी उत्पादन संस्थांना या अटीपासुन सुट हवी असल्यास त्यांनी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
12. ई - निविदेसोबत आयकर बाकी नसल्याचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. तसेच आयकर खात्याचा खाते क्रमांक नमुद करावा लागेल.

    अ. ई - निविदाधारक पार्टनरशिप करुन ई - निविदा सादर करीत असेल तर खर्चाचे व प्रत्येक सभासदाचे आयकर बाकी नसल्याचे प्रमाणपत्र तसेच खाते क्रमांक द्यावा लागेल.शिवाय त्यास पार्टनरची स्विकृती आवश्यक आहे.

    ब. ई - निविदा सोबत विक्रीकर नोदंणी क्रमांक व विक्रीकर बाकी नसल्याचे विक्रीकर खात्याचे प्रमाणपत्र, सेल्सटॅक्स क्लिअरन्स सर्टिफीकेट जोडणे आवश्यक आहे.

    क. ठेकेदाराकरीता दुकानाचा परवाना शॉप अँन्ड एक्सा.अॅक्ट अंतर्गत प्रमाणपत्र

    ड. नगरपरिषद /म्युनिसिपल कॉर्पोरशनचे व्यापार संबंधीत परवाना.

इ. अन्नधान्य वितरण करण्यासबंधी लागणारे जिल्हा पुरवठा खात्याचे परवानापत्र.

13. ई - निविदा उघडतेवेळी कंत्राटदारास पुरवठा करण्याच्या मालाचे प्रत्येकी 50 ग्रॅम वजनाचे 3 नमुने विनामुल्य सादर करावे लागतील, अन्यथा निविदा विचारात घेतल्या जाणार नाही .

14. ई - निविदा मंजुरी नंतर संस्थेचे व्यक्तीस आवश्यक तो करारनामा रु 100/- चे स्टॅम्प पेपरवर स्वतःचे ठरवुन दिलेल्या नमुन्यामध्ये त्वरीत प्रत्यक्ष ठेका सुरु करण्यापुर्वी करुन दयावा लागेल.

अ. ई - निविदा धारकांनी त्यांच्या ई - निविदा ऑनलाईन खालीलप्रमाणे सादर करावयाचे आहे.

1. **पाकीट क्र.1 तांत्रीक लिफाफा .-** या मध्ये ई - निविदा फॉर्म अ व स्टेट बँक ऑफ इंडियाचा धनाकर्ष, प्रमाणपत्र आवश्यक ती कागदपत्रे त्यावर पाकिट क्र. 1. असे नमूद करावे.
2. **पाकिट क्र.2 व्यापारी लिफाफा :-** या मध्ये ई - निविदा दरपत्रक ब (अन्नधान्य व किराणा) व ब -1 (भाजीपाल, दुध, मटन व फळे) फॉर्म टाकुन लिफाप्यावर पाकिट क्र. 2 असे नमुद करावे
3. ई - निविदा ऑनलाईन सादर करतांना (Submission) Service provider fee म्हणून शासनाने निर्धारित केलेली रक्कम रुपये 1,038/- ऑनलाईन पे करणे बंधनकारक आहे. ई निविदा खरेदी व बयाना रक्कम असे दोन धनाकर्ष दिनांक 06/09/2013 सायंकाळी 5.00 वा. पर्यंत विभागीय उपआयुक्त, महिला व बाल विकास विभाग, नाशिक विभाग, नाशिक या कार्यालयात जमा करणे आवश्यक आहे अन्यथा तांत्रिक लिफाफा उघडला जाणार नाही.

15. ई - निविदा मंजुर झाल्यास भागीदारी संस्थेला करारपत्राची सत्यप्रत करावी लागेल.

16. वर निर्देशित केलेली रक्कम बयाणा रक्कम मंजुर ई - निविदाधारकाच्या बाबतीत अनामत रक्कम आवश्यक म्हणून ती रक्कम वर्ग केली जाईल.

17. ई - निविदेतील प्रत्येक बाबींच्या दिलेल्या दराव्यतीरिक्त त्या बाबीवर कोणत्याही प्रकारचा कर वेगळा दिला जाणार नाही. थोडक्यात ई - निविदातील सर्व दर हे सर्व प्रकारच्या करासहीत असावेत संस्था पोहच असावेत.

18. संस्थेत सोबतचे पत्रामध्ये नमूद केलेल्या वस्तुंच्या मागणीप्रमाणे मालाचा पुरवठा करावा लागेल.

19. सर्व संस्थांना चांगल्या प्रतीचा माल पुरवावयाचा आहे. तथापी ई - निविदाधारकास याप्रमाणे मालाचे दर नमुद करावे लागतील. भुसार माल याचे दर प्रती किलो मध्ये असावे इतर नग/डझन/लिटर प्रमाणे असावेत.

20. संबंधित ठेक्याची मुदत सुरु झाल्याच्या तारखेपासुन 1 वर्षापर्यंत राहिल. नविन कंत्राट अस्तित्वात येण्यास अपरिहार्य कारणास्तव विलंब झाल्यास दरम्यानच्या काळामध्ये सदरच्या कंत्राटदारास प्रस्थापित नियम व अटीनुसार मंजुर केलेल्या दराप्रमाणे वस्तुंचा पुरवठा चालु ठेवणे बाबत जरुर ते आदेश देण्यात येतील. व त्यानुसार सदर मालाचा पुरवठा करण्याची जबाबदारी कंत्राटदारावर राहील. त्याचा जास्तीत जास्त कालावधी तीन महीने राहिल.त्याचे पुढील वाढीबाबत सर्व अधिकार विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास, नाशिक विभाग नाशिक यांना राहतील.

21. कंत्राट नेमुन दिलेल्या शर्तीवर व कालावधी करिता पुर्ण करणे ही कंत्राटदाराची जबाबदार राहील.याचा भंग झाल्यास संपुर्ण अनामत रक्कम अथवा विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास, नाशिक विभाग नाशिक यांना योग्य वाटेल ती रक्कम अनामत रक्कमेतुन जप्त करण्याचा आदेश देण्याचा अधिकार मा. विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास, नाशिक विभाग नाशिक यांनी राखुन ठेवला आहे. आणि त्यांचा निर्णय अंतिम राहिल. तसेच कंत्राटदारास पुर्णपणे बंधनकारक राहील.

22. कंत्राटदाराचा माल पुरविण्याचा वक्तशिरपणा व त्यांचे संस्थाप्रमुखाशी सौजन्यशील वर्तणुक या बाबींवर कंत्राटदाराचा ठेका चालु ठेवणे अगर रद्द करणे अवलंबून आहे.

23. मालाचा पुरवठा नियमितपणे मान्य केलेल्या दराप्रमाणे संस्थाप्रमुखांच्या मागणीप्रमाणे संस्था अथवा त्यांनी ठरवुन दिलेल्या जबाबदार अधिका-याकडे करावा लागेल. व त्याची पोच घ्यावी लागेल. संस्थाप्रमुखाच्या मागणीनुसार एक ते दिड महिन्याचे कालावधीसाठी आवश्यक असणारा माल पुरवावा लागेल. त्यापेक्षा कमी अगर जास्त माल कंत्राटदारास पुरविता येणार नाही.

24. माल पुरविण्याच्या वेळी मालाचे वर्णन , वजन, किंमत इ.चे डिलेव्हरी चलन लगेच संस्थेत देऊन संस्थेच्या अधिकृत व्यक्तिंची पोहोच घ्यावी लागेल. तसेच ठेकेदाराने पूरविलेले मालाचे बील पुरवठयानंतर संबधित संस्थाना सादर करावा लागेल. पुरवठयाची चलनं व इतर तपशिल सादर करण्याची जबाबदारी कंत्राटदारावर राहील. देयकाची रक्कम धनादेशाद्वारे अदा करण्यात येईल.

25. कंत्राटदाराने माल पुरवितांना तो त्या कंत्राटदाराचाच आहे, हे ओळखण्यासाठी आवश्यक त्या पॅकिंग व सीलचा

उपयोग करावा.

26. ठेकेदार पुरवित असलेला माल भेसळयुक्त आहे असे निदर्शनास आल्यास व ते सिध्द झाल्यास संबंधित ठेकेदारास भेसळ प्रतिबंधक कायदयातील तरतुदीस तोंड दयावे लागेल. या नियमांच्या उल्लंघनाबद्दल जो दंड शिक्षा निर्णय होईल त्यांची संपुर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहिल. पुरवठा केलेला माल खराब असल्याचे निर्दशनास आल्यास धान्य पुरवठा धारकास काळया यादीत समाविष्ठ करणे किंवा कंत्राट रद्द करणे याचा निर्णय विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास, नाशिक विभाग नाशिक यांना राहतील . तो पुरवठाधारकास पुर्णतः बंधनकारक असेल.

27. मालाचे प्रतीसंबंधी शंका उपस्थित झाल्यास व आवश्यकता भासल्यास विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास, नाशिक विभाग नाशिक किंवा त्यांनी नेमणुक केलेल्या अधिका-यास पुरविलेल्या मालाचा नमुना घेवून व शासकिय प्रयोग शाळेत तपासणीसाठी पाठविण्याचा अधिकार राहील व सदर नमूने तपासणी फी देणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.

28. संबंधीत संस्था प्रमूखाकडून माल पूरवठयाची सूचना प्राप्त झाल्यास 15 दिवसाच्या कालावधीत संस्थेला माल पूरवठा करणे बंधनकारक राहील.मालाचा पुरवठा केला नाही किंवा मागणी केलेला माल योग्य वेळी पूरविला नाही, तर तेवढा माल बाहेरुन स्थानिक बाजारातुन खरेदी केला जाईल. अशावेळी मंजुर निविदा दर आणि बाजार पेठेतील दर यातील अदा असलेली तफावतीची रक्कम ठेकेदाराचे देयकातुन परस्पर वसुल केली जाईल.

29. नमुना तपासणी अहवाल प्रयोग शाळेतुन अप्राप्त असल्यास पुरवठा केलेल्या मालाची किंमत प्रलंबित ठेवली जाईल निर्णयानंतर त्यावर योग्य ती कार्यवाही केली जाईल.

30. कंत्राटदाराला किंवा कंत्राटदाराचा कोणताही भाग इतर कोणत्याही इसमाला, संस्थेला, फर्मला, कंपनीला किंवा खाजगी व्यक्तीला हस्तांतरीत करणे ही बाब दखलपात्र गुन्हा राहील.

31. मागणी नोंदविलेल्या सर्व वस्तु दिड महिन्यांच्या कालावधीसाठी आवश्यक एवढयाच प्रमाणात संस्थाप्रमुख स्विकारतील.त्यापेक्षा जास्त माल ठेकेदारास पुरविता येणार नाही. अन्यथा बीले अदा केले जाणार नाही. कार्यालयीन वेळेत मालाचा पुरवठा करावा लागेल.

32. ई - निविदा ठरवुन दिलेल्या समितीसमोर उघडण्यात येतील. वस्तुची प्रत/दर्जा वस्तुचे दर व इतर संबंधिच्या बाबी समितीच्या शिफारशीनुसार अतिंम राहतील. व त्या ई - निविदा धारकास बंधनकारक राहतील.

33. ई - निविदा धारकाने जमा केलेली बयाणा रक्कम ई - निविदा स्विकारल्यास अनामत रक्कम म्हणुन वर्ग केली जाईल. व सदर रक्कम त्या कालावधीचे लेखा परिक्षण झालेनंतर परत केली जाईल.

34. ई - नविदा ऑनलाईन स्विकारण्याचा अंतिम दिनांक 07 /09/2013 रोजी दुपारी 17 .00 वाजेपर्यत राहील (ऑनलाईन खरेदी व प्रिपरेशन स्टेज पुर्ण झाली असेल तरच)

35. प्राप्त ई - निविदा दि. 07/09/2013 रोजी दुपारी 17.01 वाजता उपस्थित ई - निविदा धारकांच्या समक्ष अथवा प्राधिकृत प्रतिनिधी समक्ष अथवा निविदाधारकाची उपस्थिती नसल्यास तरी या कार्यालयाच्या खरेदी समीतीकडुन ई - निविदा उघडण्यात येतील. कार्यालयाच्या काही अपरिहार्य कारणास्तव ई - निविदा उघडण्याच्या तारखेत बदल झाल्यास तशी सुचना कार्यालयाच्या सुचना फलकावर लावण्यात येईल.

36. पुरवठा धारक हा स्थानिक जिल्हयातील असावा.

37. एखादया ई - निविदेस कमी प्रतिसाद मिळाल्यास सदर ई - निविदा किमान दोन वेळेस पुन्हा प्रकाशित करण्यात येईल.

## निविदाबाबत राखुन ठेवलेले अधिकार

**38.** ई - निविदा ऑनलाईन स्विकाराली जाईल.

39. ई - निविदा स्विकारण्याची मुदत किंवा वेळ वाढविली जाणार नाही.

40. ई - निविदा स्विकारण्याचा ई - निविदा उघडण्याचा किंवा न उघडण्याचा अधिकार तसेच कोणतेही कारण न दाखविता ई - निविदा मंजुर करणे किंवा नामंजुर करणेचा अधिकार समितीकडे राहील.

41. विक्रीकर नोंदणी क्रमांक धारण करणा-या ठेकेदाराचीच ई - निविदा मंजुर करण्यात येईल.

42. नोंदणीकृत महिला संस्था व महिला सहकारी संस्था यांना ई - निविदा मंजुर करतांना प्राधान्य देण्यात येईल. संस्थांच्या मागणीप्रमाणे त्या बाबतची संस्थेकडुन तक्रार आल्यास ठेकेदारास दंड करण्याचा अधिकार विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास, नाशिक विभाग, नाशिक यांना राहील. मंजुर ई - निविदा व मुदतीच्या कालावधीमध्ये केव्हाही व कोणतेही कारण न दाखविता अगर आगाऊ सुचना न देता ठेका रद्द

करण्याचा अधिकार विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास, नाशिक विभाग नाशिक यांनी पुर्णतः राखुन ठेवला आहे.

43. परिस्थितीनुसार नविन योग्य ती अट घालण्याचा - अर्तंभुत करण्याचा अधिकार विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास, नाशिक विभाग नाशिक यांना राहील.

44. मंजुर ई - निविदा धारकास करावयाचे करारनाम्यामध्ये अथवा ई - निविदेमध्ये फेर फार करण्याचा , पुर्णपणे वगळण्याचा अथवा नविन अंर्तभुत करण्याचा विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास,नाशिक विभाग, नाशिक यांना राहील.

45. ई - निविदा आणि त्या बाबतच्या अटी व नियम याचा अर्थ लावण्याचा संपुर्ण अधिकार विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास, नाशिक विभाग नाशिक यांना राहील

46. कोणतेही कारण न दाखवता कोणतीही ई - निविदा स्विकारण्याचा अगर रद्द करण्याचा किंवा अशंतः एखादा भागस्विकारण्याचा अगर रद्द करण्याचा अधिकार विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास, नाशिक विभाग नाशिक यांनी राखुन ठेवला आहे.

47. ज्या ठेकेदाराचे नाव काळया यादीमध्ये आहे त्याच्या कोणत्याही नातेवाईकास ठेका देण्यात येणार नाही. याची नोंद सदर ठेकेदाराने ई - निविदा भरतेवेळी घ्यावी.

48. कुठल्याही सहकारी संस्थांना अगर कत्रांटदारांना सबकत्रांटदार ठेवता येणार नाही._ज्यांच्या ई - निविदा मंजुर झालेल्या व स्विकारण्यात आलेल्या आहेत अशा ई - निविदा धारकांना त्वरीत करारनामा करावा लागेल व करारनाम्याच्या वेळी अनामत रक्कम संबधित संस्थेच्या कार्यालयात भरावी लागेल.

49. ज्या पुरवठाधारकांनी - महिला संस्था , महिला सहकारी संस्था व इतर -ई - निविदा फॉर्ममध्ये मागविण्यात आलेली सर्व कागदपत्रे व विहीत प्रमाणपत्रे स्पष्ट साक्षांकित प्रती सादर केल्या असतील अशाच पुरवठाधारकांच्या ई - निविदांचा विचार केला जाईल.

50. जिल्हास्तरीय प्राप्त ई - निविदा उघडून त्या ई - निविदामधील सर्वात कमी दर असलेल्या दरांशी तुलना महाराष्ट्र स्टेट कन्झ्युमर्स फेडरेशन मुंबईकडून प्राप्त झालेल्या दराशी करण्यात येईल व शासनाने दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

विभागीय उप आयुक्त
महिला व बाल विकास विभाग
नाशिक विभाग नाशिक

**टिप** :-वरील सर्व अटी-शर्ती, नियम व सुचना आम्ही वाचल्या असुन त्या मला/आम्हाला आमच्या संस्थेस मान्य आहेत व त्या स्विकृत करुन स्वाक्षरी करुन ई - निविदासोबत जोडलेल्या आहेत

दिनांक :- / / 2013

ठेकेदाराची सही व शिक्का
नांव व पत्ता

**निविदा फॉर्म -ब**

**नाशिक विभागातील जिल्हयातील शासकीय संस्थांसाठी**

मध्यम प्रतिचे दर्जेदार वस्तुचे दर नमुद करावेत वस्तुचे दर प्रचलित बाजारभावाशी मिळते जुळते असावे वस्तु अन्नधान्य यांचे दर प्रति किलो प्रमाणे व प्रकाराप्रमाणे स्वतंत्रपणे वेगळे नमुद करण्यात यावेत (अन्नधान्य, किराणा व किरकोळ वस्तू) सन 2013-14 करिता.

| अ.क्र. | वस्तुचे नांव | प्रकार / ब्रॅड | परिमाण (किलो/लिटर/नग/डझन इ.) | वस्तुचे दर |
|---|---|---|---|---|
| 1. | गहु | | प्रति किलो. | |
| 2. | तांदुळ | | प्रति किलो. | |
| 3. | ज्वारी | | प्रति किलो. | |
| 4 | बाजरी | | प्रति किलो. | |
| 5 | तुरडाळ | | प्रति किलो. | |
| 6. | मुगडाळ | | प्रति किलो. | |
| 7. | हरभरा डाळ | | प्रति किलो. | |
| 8. | मसुरडाळ | | प्रति किलो. | |
| 9. | साखर | | प्रति किलो. | |
| 10. | गुळ | | प्रति किलो. | |
| 11 | शेंगदाणे | | प्रति किलो. | |
| 12 | साबुदाणे | | प्रति किलो. | |
| 13 | मटकी | | प्रति किलो. | |
| 14 | चवळी | | प्रति किलो. | |
| 15 | काळा वाटाणा | | प्रति किलो. | |
| 16 | तुर | | प्रति किलो. | |
| 17 | आख्खा मसुर | | प्रति किलो. | |
| 18 | मुग | | प्रति किलो. | |
| 19 | हरभरा /चणा | | प्रति किलो. | |
| 20 | काबुली चणा | | प्रति किलो. | |
| 21 | हिरवा वाटाणा | | प्रति किलो. | |
| 22 | पिवळा वाटाणा | | प्रति किलो. | |
| 23 | पोहे | | प्रति किलो. | |
| 24 | रवा | | प्रति किलो. | |
| 25 | मैदा | | प्रति किलो | |
| 26 | खोबरेल तेल | | प्रति किलो. | |
| 27 | शेंगदाणा तेल | | प्रति किलो. | |
| 28 | वनसप्ती तूप | | प्रति किलो. | |
| 29 | चहा पावडर | | प्रति किलो. | |
| 30 | मीठ (आयोडिन युक्त) | | प्रति किलो. | |
| 31 | लसूण | | प्रति किलो. | |
| 33 | साधा मसाला | | प्रति किलो. | |
| 34 | मोहरी | | प्रति किलो. | |
| 35 | गरम मसाला | | प्रति किलो. | |
| 35 | खोबरे | | प्रति किलो. | |
| 36 | जीरे | | प्रति किलो. | |
| 37 | हळद पावडर | | प्रति किलो. | |
| 38 | मीरची पावडर | | प्रति किलो. | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 39 | लवंग | | प्रति किलो. | |
| 40 | दालचिनी | | प्रति किलो. | |
| 41 | धने | | प्रति किलो. | |
| 42 | वेलची | | प्रति किलो. | |
| 43 | हिंग पावडर | | प्रति किलो. | |
| 44 | अंगाचा साबण | संतुर 100 ग्रॅम | प्रति नग | |
| 45 | कपडयाचा साबण | व्हिल 250 ग्रॅम | प्रति नग | |
| 46 | धुण्याचा सोडा | पावडर | प्रति किलो | |
| 47 | साबन चुरा | वाशिंग पावडर व्हील | प्रति किलो | |
| 48 | भांडे धुण्याचा साबण | विम बार 250ग्रॅम | प्रति नग | |
| 49 | दंत मंजन | कोलगेट पावडर 100 ग्रॅम | प्रति नग | |
| 50 | ब्लॅक फिनेल | | प्रति लिटर | |
| 51 | खराटा | | प्रति नग | |
| 52 | फुलझाडू | | प्रति नग | |
| 53 | आगपेटी | | प्रति बॉक्स | |
| 54 | ॲसीड | | प्रति लिटर | |
| 55 | टुथब्रश | | प्रति नग | |
| 56 | शॅम्पू | | प्रति नग | |
| 57 | पापड | | प्रति किलो | |
| 58 | लोणचे | | प्रति किलो | |
| 59 | टुथ पेस्ट | | प्रति नग | |
| 60 | बेबी सुट | | प्रति नग | |
| 61 | 200 पानी रेघी वही | | प्रति डझन | |
| 62 | 100 पानी रेघी वही | | प्रति डझन | |
| 63 | 100 पानी रजिष्टर | | प्रति डझन | |
| 64 | 3 क्वायर रजिष्टर | | प्रति डझन | |
| 65 | कार्यानुभव वहया | | प्रति डझन | |
| 66 | प्रयोग वहया | | प्रति डझन | |
| 67 | आलेख वहया | | प्रति डझन | |
| 68 | चित्रकला वहया | | प्रति डझन | |
| 69 | कंपास पेटी | | प्रति नग | |
| 70 | कोरे फुल स्केप पेपर | | प्रति दस्ता | |
| 71 | रेघ फुलस्केप पेपर | | प्रति दस्ता | |
| 72 | कार्डशिट पेपर | | प्रति डझन | |
| 73 | पुठ्ठा फाईल | | प्रति नग | |
| 74 | घडी फाईल | | प्रति डझन | |
| 75 | बॉलपेन | | प्रति डझन | |
| 76 | बॉलपेन रिफिल | | प्रति बॉक्स | |
| 77 | रंग पेटया | | प्रति बॉक्स | |
| 78 | फुट पेटी | | प्रति डझन | |
| 79 | पेन्सिल | | प्रति बॉक्स | |
| 80 | शॉपर्नर | | प्रति डझन | |
| 81 | खोडरबर | | प्रति डझन | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 82 | टाचणी बॉक्स | | प्रति नग | |
| 83 | टॅग लहान | | प्रति बंडल | |
| 84 | टॅग मोठे | | प्रति बंडल | |
| 85 | डिंक बाटली ( मोठी ) | | प्रति नग | |
| 86 | छोटी कातरी | | प्रति नग | |
| 87 | प्रोजेक्ट पेपर | | प्रति डझन | |
| 88 | स्वेटर उलन | | प्रति नग | |
| 89 | लेडीज चप्पल/बुट | | प्रति नग | |
| 90 | रेन कोट लेडीज | | प्रति नग | |
| 91 | प्लॅस्टिक बादली मध्यम | | प्रति नग | |
| 92 | प्लॅस्टिक बादली लहान | | प्रति नग | |
| 93 | प्लॅस्टिक बादली मोठी | | प्रति नग | |
| 94 | कंगवा प्लॅस्टिक | | प्रति डझन | |
| 95 | स्टॅपलर लहान | | प्रति नग | |
| 96 | स्टॅपलर मोठे | | प्रति नग | |
| 97 | कपडे घासण्याचा ब्रश | | प्रति नग | |
| 98 | मच्छर अगरबत्ती | | प्रति बॉक्स | |
| 99 | सॅनेटरी नॅपकीन व्हीस्पर लार्ज पॅकेट | | प्रति डझन | |
| 100 | टॉवेल 4 फुट x2.5 फुट कॉटन | | प्रति नग | |
| 101 | ब्लकेट मोठे | | प्रति नग | |
| 102 | पिलो कव्हर | | प्रति नग | |
| 103 | गादी कव्हर | | प्रति नग | |
| 104 | लेडीज निकर | | प्रति नग | |
| 105 | ब्रेसियर | | प्रति नग | |
| 106 | पंजाबी ड्रेस | | प्रति नग | |
| 107 | अंर्तवस्त्रे ( स्लीप ) | | प्रति नग | |
| 108 | संतरजी 6x3 | | प्रति नग | |
| 109 | चादर सोलापूरी | | प्रति नग | |
| 110 | बेडसिट ( कॉटन ) | | प्रति नग | |
| 111 | बाबासुट 6 महिन्याचे बाळाचे | | प्रति नग | |
| 112 | महिला साडी | | प्रति नग | |
| 113 | परकर | | प्रति नग | |
| 114 | टयुब लाईट | | प्रति नग | |
| 115 | टयुब नळीसह | | प्रति नग | |
| 116 | पॉवर शॉवर बल्स | | प्रति नग | |
| 117 | इलेक्ट्रीक वायर 1.8ची | | प्रति मिटर | |
| 118 | नाईट बल्ब | | प्रति नग | |
| 119 | टयुबलाईट चोक | | प्रति नग | |
| 120 | टयुबलाई स्टार्टर | | प्रति नग | |
| 121 | हेअर रिबन | | प्रति डझन | |
| 122 | मार्कर पेन | | प्रति नग | |
| 123 | कुलुप लहान | | प्रति नग | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 124 | कुलूप मोठे | | प्रति नग | |
| 125 | बॅटरी सेल लहान | | प्रति नग | |
| 126 | बॅटरी सेल मोठे | | प्रति नग | |
| 127 | स्कुल बॅग मोठी | | प्रति नग | |
| 128 | शालेय गणवेश | | प्रति नग | |
| 129 | रंगित गणेवश | | प्रति नग | |
| 130 | अंडरवेअर | | प्रति नग | |
| 131 | बनियन | | प्रति नग | |
| 132 | युनिफार्म साडी | | प्रति नग | |
| 133 | मोठे मग | | प्रति डझन | |
| 134 | बेबी बॅकेट | | प्रति नग | |
| 135 | मच्छरदाणी मोठी | | प्रति नग | |
| 136 | मच्छरदाणी लहान | | प्रति नग | |

निविदा धारकाची सही व शिक्का
नांव व पत्ता

**निविदा फॉर्म -ब (1)**
**नाशिक विभागातील शासकीय संस्थांसाठी**

मध्यम प्रतिचे दर्जेदार वस्तुचे दर नमुद करावेत वस्तुचे दर प्रचलित बाजारभावाशी मिळते जुळते असावे (दुध,मटण, भाजी, इत्यादी.) कालावधी - सन 2013-2014.

| अ.क्र. | वस्तुचे नांव | प्रकार / ब्रॅड | परिमाण (किलो/लिटर/नग/डझन इ.) | वस्तुचे दर |
|---|---|---|---|---|
| 1 | फळ भाजी | | प्रति किलो | |
| 2 | पाले भाजी | | प्रति किलो | |
| 3 | कंद भाजी | | प्रति किलो | |
| 4 | मोसंबी | | प्रति किलो | |
| 5 | चिकू | | प्रति किलो | |
| 6 | संत्री | | प्रति किलो | |
| 7 | केळी | | प्रति डझन | |
| 8 | पेरु | | प्रति किलो | |
| 9 | संफरचंद | | प्रति किलो | |
| 10 | कांदा | | प्रति किलो | |
| 11 | बटाटा | | प्रति किलो | |
| 12 | लिंबू | | प्रति नग | |
| 13 | सरपण (जळाऊ लाकुड) | | प्रति किलो | |
| 14 | मटण -बोकडाचे (ताजे-स्वच्छ-हाडासहित) | | प्रति किलो | |
| 15 | अंडी | | प्रति डझन | |
| 16 | दूध | 6 फॅट | प्रति लिटर | |
| 17 | दही | | प्रति किलो | |
| 18 | ताक | | प्रति लिटर | |
| 19 | ब्रेड | | प्रति पुडा | |
| 20 | दळण | | प्रति किलो. | |
| 21 | ओला मसाला (कोथिंबीर, हिरवी मिरची, आले, खोबरे) | | प्रति किलो. | |
| 22 | चिकन (ब्रॉयलर) | | प्रति किलो. | |
| 23 | मासे | | प्रति किलो. | |
| 24 | दुध पावडर | | प्रति किलो. | |

निविदा धारकाची सही व शिक्का
नांव व पत्ता